# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २६/०८/२०२४ (सोमवार)

---

## जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस एमआयडीसी बोरी पोलीसांनी केले अटक

दिनांक २४/०८/२०२४ चे १०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— बिरसा लालचंद गुंडेवार वय ४० वर्षे रा. वार्ड ०१ मेहंदीवाडा ता. पाराशिवनी जि. बालाघाट ह. मु. रा सातगाव बुट्टीबोरी श्रीमंडल यांचे साईडवर हे मौजा बिडगणेशपुर येथे गेले असता यातील **आरोपी नामे— रामकृष्ण रघुनाथ येरकाडे, वय ३५ वर्षे रा. वार्ड क्र. ०६ बिडगणेशपुर** याने त्याचे मागील हिसोबातील उधारीचे पैशाच्या कारणावरून शिवीगाळ केली व हातातील विटेने फिर्यादीचे डोक्यावर मारून जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न केला. आरोपीला दिनांक २५/०८/२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे एमआयडीसी बोरी येथील ठाणेदार पोनि सतिशसिंग राजपूत, सपोनि भुजबळ, पोउपनि सुशिल सरकार, पोउपनि रामदास खोत, पोहवा विनोद अहिरकर, पोअं दिलीप नवले यांनी पार पाडली.

## मोहाफुल गावठी दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

दिनांक २५/०८/२०२४ रोजी पोस्टे कळमेश्वर येथील स्टाफ यांना गोपनीय माहिती मिळाली की, सरदार मोहल्ला कळमेश्वर येथे आरोपी दरदारसिंग मायासिंग भादा, वय ४२ वर्ष रा. वार्ड क्र १५ सरदार मोहल्ला कळमेश्वर यांचे राहते घरी हा अवैधरीत्या विनापरवाना गावठी मोहाफुल दारूची विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून रेड कारवाई करून आरोपीचे ताब्यातून २५ लिटर डबकी गावठी मोहापुल हातभटटी दारू भरलेली प्रत्येकी १००/—रू लिटर प्रमाणे एकुन किंमती २,५०० रू माल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कळमेश्वर येथील ठाणेदार पोनि मनोज काळबांडे, पोउपनि कोरडे, सफौ मिश्रा, पोहवा ठाकरे, पोअं. गाडगे, मपोशि चरडे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर